## आतील पानात

- जेमिमाह रॉड्रिग्स : आत्मविश्वास, प्रतिभा आणि नव्या भारतातील स्त्रीशक्तीचं प्रतीक...
- प्रदूषणाने झालेले मृत्यू म्हणजे सार्वजनिक आरोग्य संकट
- बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्याचे पांडुरंगाला साकडं!



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

स्वतःची तुलना जगात
कोना सोबत करू नका...
जर तुम्ही असं केलंत तर
तुम्ही स्वतःचा अपमान करताय...
– बिल गेट्स


वर्ष : ०५ | अंक : ८०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०३ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# भारताच्या रणरागिणींनी रचला नवा इतिहास !

## दक्षिण आफ्रिकेला नमवत वर्ल्ड कप जिंकला !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नवी मुंबई :** भारताच्या रणरागिणींनी इतिहास रचला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली प्रथम महिला वर्ल्ड कप अखेर भारताने जिंकला. शेफाली वर्मा यावेळी भारतीय संघासाठी मॅचविनर ठरली. शेफालीने फलंदाजीत सर्वाधिक ८७ धावा तर केल्याच, पण जेव्हा संघाला गरज होती तेव्हा विकेट्सही काढून दिल्या. त्यामुळे शेफाली वर्माच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारताला वर्ल्ड कपला गवसणी घालता आली. शेफालीच्या खेळीच्या जोरावर भारताने २९८ धावा उभारल्या होत्या. भारताच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी नमवले आणि वर्ल्ड कप जिंकला.




शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी संघाला धडाकेबाज सुरुवात करून दिली. स्मृतीचे अर्धशतक यावेळी फक्त पाच धावांनी हुकले, तिने आठ चौकारांच्या जोरावर ४५ धावा केल्या. स्मृती बाद झाल्यावर शेफालीने जेमिमासह डावाला आकार दिला. शेफाली आणि जेमिमा यांनी ६२ चेंडूंत ६२ धावांची भागीदारी उभारली. ज्यात जेमिमाने २३, तर शेफालीने ३८ धावांचे योगदान दिले. कारकिर्दीतील पहिल्या वनडे शतकाकडे वाटचाल करणाऱ्या शेफालीला खाका हिने लूस हिच्याकरवी झेलबाद केले. शेफालीने यावेळी ७८ चेंडूंत सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ८७ धावा उभारल्या. खाकाने स्थिरावलेल्या शेफालीस चूक करण्यास भाग पाडले. खाका हिने आपल्या पुढच्याच षटकात उपांत्य सामन्याच्या विजयाची शिल्पकार जेमिमा रॉड्रिग्ज (२४) हिला ‘कव्हर’ला कर्णधार वोल्वार्द हिच्याकरवी झेलबाद केले. पॉवरप्लेच्या षटकांत महागात पडलेल्या अयाबोंगा खाका हिने शेफाली आणि जेमिमा यांचा अडसर दूर करत भारताच्या धावगतीवर अंकुश लावला. ही संथगती टाळण्यासाठी रिचा घोष हिला फलंदाजीत बढती देता आली असती, पण बहुदा पडझड रोखण्यासाठी दीप्ती शर्मा आणि अमनजोत कौर यांना फलंदाजीस पाठवण्यात आले. एमलाबा हिच्या गोलंदाजीवर प्रतिस्पर्धी कर्णधार वूलवार्द हिने दीप्तीला लाँगऑनवर ३८ धावांवर जीवदान. मग डी क्लार्क हिने आपल्याच चेंडूवर एकहाती झेल टिपत अमनजोत कौरला पॅव्हेलियनमध्ये धाडत ही जोडी फोडली. रिचाने त्यानंतर येऊन २४ चेंडूंत ३४ धावांची आक्रमक खेळी साकारली.

भारताच्या २९९ धावंचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने दमदार सुरुवात केली होती. पण अमनज्योतच्या थेट फेकीमुळे भारताला पहिली विकेट मिळाली. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेच्या धावा रोखल्या होत्या. पण भारताच्या विजयाच्या मार्गात एकच अडसर होती आणि ती म्हणजे लॉरा वोल्ववॉर्ट. लॉराने अर्धशतक झळकावले होते आणि तिने शतकाच्या दिशेने कूच करायला सुरुवात केली होती. तिने शतक झळकावले पण संघाला ती सामना जिंकवू शकली नाही.

भारत दुसऱ्यांदा वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये पोहोचला होता. यापूर्वी भारताला २०१७ साली उपविजेते पदावर समाधान मानावे लागले होते.

### • काय ते नशीब आली अन, वर्ल्ड कप जिंकवून दिला !

जी संघातच नव्हती, तीच भारतासाठी मॅचविनर ठरली आणि देशाला पहिला वर्ल्ड कप जिंकवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. ही गोष्ट आहे भारताच्या संघातील लेडी सेहवागची. फॉर्मात नसल्यामुळे एका वर्षापूर्वीच तिला संघाबाहेर केले होते. पण नशिब एवढं बलवत्तर निघालं की, थेट वर्ल्ड कपच्या संघात तिला संधी मिळाली. या संधीचे तिने सोनं केलं आणि देशाला वर्ल्ड कप जिंकवून दिला.

स्मृती मानधना आणि प्रतिका रावल यांची जोडी चांगलीच जमली होती. या दोघी भारताला चांगली सुरुवातही करुन देत होत्या. पण बांगलादेशविरुद्ध भारताचा अखेरचा साखळी साम ना होता. या सामन्यात प्रतिकाला दुखापत झाली. प्रतिकाची दुखापत एवढी गंभीर होती की, यापुढे ती एकही सामना खेळू शकणार नव्हती. त्यावेळी भारतीय संघाला आठवली ही लेडी सेहवाग, जिने भारताना वर्ल्ड कप जिंकवून दिला.

कामगिरीतील सातत्याच्या अभावामुळे शेफाली वर्मा हिला २०२४च्या ऑक्टोबरमध्ये भारताच्या वनडे संघातून दूर करण्यात आले. त्यानंतर गेले वर्षभर निवड समितीपुढे आपली उपयुक्तता सिद्ध करण्यासाठी शेफाली हिने मेहनत घेतली; पण तिचा भारतीय यंदाच्या वर्ल्ड कपसाठीही विचार झाला नाही. प्रतिका रावल जायबंदी झाली अन् शेफालीला अनपेक्षित संधी लाभली. अंतिम फेरीत तिने ८७ धावांची खेळी करत आंतरराष्ट्रीय स्तरावरच उपयुक्तता सिद्ध केली. तिचा खेळ आक्रमक होता, पण यावेळी फटकेबाजीसह एकेरी, दुहेरी धावा आणि अचूकवेळी चौकार, षटकार असे हुशारीचे नियोजन तिने केले होते.

‘मला संधी मिळाली तर सोडणार नाही... चेंडू स्टँडमध्ये धाडणार’, वर्षभरानंतर पुनरागमन करताना व्यक्त केलेला हा आत्मविश्वास भारताची फलंदाज शेफाली वर्मा हिने रविवारी मोक्याच्या क्षणी सार्थ ठरविला. तिच्या ८७ धावांच्या खेळीने केलेली पायाभरणी आणि दीप्ती शर्मा (५८) अर्धशतकाचा हातभार लागल्याने भारताने वर्ल्ड कप महिला वनडे क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेपुढे २९९ धावांचे आव्हान ठेवले. शेफालीने दोन बळीही मिळवले आणि भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

---

## ४ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी एकाला निर्घृणपणे संपवलं

### घटनेनं नागपुरात खळबळ !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नागपूर :** कंपनीकडून नोकरीसाठी महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणाऱ्या कॅम्पस प्लेसमेंट चाचणी परीक्षेतील कॉपीच्या चौघांनी वादातून अल्पवयीन साथीदाराच्या मदतीने नूर नवाज हुसेन (वय २१, रा. दुर्गानगर, पारडी) याची हत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नूर हत्याकांडात पारडी पोलिसांनी अभियांत्रिकीच्या चार विद्यार्थ्यांना अटक करून त्यांच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले.

**काय घडलं ?**

पारडीच्या एचबी टाउन येथे शुक्रवारी रात्री ही घटना घडली होती. खिलेश्वर रामेश्वर बिसेन (वय १९, रा. श्यामनगर, पारडी नाका), अन्नू ऊर्फ अनस अहमद अब्दुल वकील (वय १९, रा. गंगाबाग, पारडी), प्रतीक ऊर्फ आदित्य राजू करंडेकर (वय १९, रा. साईनगर, कळमना) व प्रवीण मृत्युंजय पांडे (वय २०, रा. भवानीनगर, पारडी) अशी अटकेतील मारेकऱ्यांची नावे आहेत. नूर हा अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये बीटेकच्या अंतिम वर्षाला शिकत होता. नूरचा मित्र हर्षल संजय रामटेके (वय २१, रा. पडोळेनगर, वाठोडा) हा जीएच रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगमध्ये बीटेकच्या तृतीय वर्षाला तर बिसेन हा याच कॉलेजमध्ये हर्षलसोबत शिकतो. पांडेही अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असून, १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा बारावीत आहे.

प्राप्त माहितीनुसार, अभियांत्रिकी महाविद्यालयात नोकरीसाठी विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा घेण्यात येते. कंपन्यांचे पेपर सारखेच असतात. परीक्षेत बहुतांश विद्यार्थी कॉपी करून पेपर सोडवितात. याच पेपरच्या कॉपीवरून हर्षल व बिसेनचा अनेक दिवसांपासून वाद सुरू आहे. याबाबत हर्षलने नूरलाही सांगितले होते. शनिवारी पोलिसांनी बिसेन व त्याच्या साथीदारांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने चौघांची चार दिवस पोलिस कोठडीत रवानगी केली. बिसेन व हर्षलचा अनेक दिवसांपासून वाद सुरू आहे. या वादातूनच नूर हत्याकांड घडल्याचा दावा पोलिस करीत आहेत.

---

## दोन मित्रांच्या अपघाती निधनाने बुलढाणा हळहळले



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलडाणा :** मित्राच्या लग्न समारंभामध्ये सहभागी होऊन अतिशय आनंदाच्या वातावरणात आनंदाचे क्षण घालवले. मित्रपरिवार नातेवाईक यांच्यामध्ये मग्न होत घराकडे निघालेल्या दोन युवकांचा अपघाती मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील दुसर बीड येथून लग्न समारंभ आटपून घरी परत येत असलेले दोन युवक दुचाकी अपघातात ठार झाल्याची घटना ३१ ऑक्टोंबर रोजी घडली आहे. या दुर्दैवी घटनेने साखरखेर्डा गावावर शोककळा पसरली असून संपूर्ण गाव स्तब्ध होऊन गेले आहे. दिवाळीचा उत्साह संपल्यानंतर आता लग्न समारंभ मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहेत आणि यात ग्रामीण भागात गावाजवळ लगतच्या कार्यक्रमाकरिता दुचाकी मोठ्या प्रमाणात युवक वर्ग वापरत असतो, अशानेच रस्ते गुळगुळीत झाले आहेत यानेच अपघाती मृत्यूंचे प्रमाण वाढले आहे.

---

## शिरुरच्या पिंपरखेडमध्ये संतप्त ग्रामस्थांनी वन विभागाचं कार्यालय पेटवलं

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पुणे :** शिरुर तालुक्यातील पिंपरखेडमधून मोठी बातमी समोर येत आहे. या गावातील एका १३ वर्षीय मुलावर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे संपूर्ण गावात संतापाची लाट पसरली आहे.

बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना सध्या महाराष्ट्रात वाढल्या आहेत. शिरुपच्या पिंपरखेडमध्ये घडलेल्या या घटनेमुळे गावकरी प्रचंड संतप्त झाले आहे. गावकऱ्यांनी या घटनेनंतर वन विरोधाच्या आक्रमक भूमिका घेतली आहे. पिंपरखेडच्या संतप्त नागरिकांनी वन विभागाच्या कार्यालयाला आग लावली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. परिसरात सध्या प्रचंड तणावाचं वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर आहे, अशी चर्चा सुरु होती. स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत वेळोवेळी पोटतिडकीने आपले प्रश्न मांडले होते. सुरक्षेचा प्रश्न वारंवार उपस्थित करण्यात आला होता. अखेर आज एका बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर ग्रामस्थन संतापले. ग्रामस्थांनी आधी वन विभागाची गाळी पेटवून दिली होती. यानंतर रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला होता. तसेच रास्ता रोको देखील करण्यात आला. त्यानंतर आता वन विभागाचं कार्यालयच पेटवून देण्यात आलं आहे.

या परिसरात बिबट्या आणि माणसं यांच्यातील संघर्ष टोकाला पोहोचला आहे. बिबट्याने आज १३ वर्षीय मुलावर हल्ला केल्यानंतर गावकरी संतप्त झाले. मुलाचा मृतदेह घराबाहेर ठेवत त्याच्या नातेवाईकांसह गावकऱ्यांनी आंदोलन केलं. संतप्त गावकऱ्यांनी बेल्हे–जेजुरी महामार्ग रोखला. तसेच वन विभागाची गाडी आणि नंतर



कार्यालय पेटवत जाळपोळीच्या घटना घडल्या. या घटनेनंतर परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात झाला आहे. कोणत्याही प्रकारची अप्रिय घटना घडू नये यासाठी पोलिसांकडून सर्वोतोपरी काळजी घेतली जात आहे. या घटनेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली.

मी या घटनेबाबत चर्चा करण्यासाठी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांची वेळ मागतो. मी उद्याच या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही बोलणार आहे. कारण आता लोकांची सहनशीलता संपली आहे. जंगलातली नाही तर ऊसामध्ये वाढलेली बिबटे आहेत. विशेषत: जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरुर, पारनेर, अकोले इथून ते पार दौंड पर्यंत बिबटे आले आहेत. त्यांची ऊसामध्ये पैदास होते, असं अजित पवार म्हणाले आहेत.

---

## ‘हॉटेल ताडोबा अतिथी इन’ येथील कुंटणखान्यावर धाड

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरने लोहारा येथील हॉटेल ताडोबा अतिथी इन येथे चालविण्यात येत असलेल्या कुंटणखान्यावर धाड टाकत एका महिलेची सुटका केली. तसेच आरोपीला अटक केली.

दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी रामनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. यावेळी त्यांना गुप्त माहिती मिळाली की, लकी नावाचा मुलगा हॉटेल ताडोबा अतिथी इन, लोहारा येथे स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी पिडीत महिलांना हॉटेलमध्ये बोलावून कुंटणखाना चालवित आहे.. या गुप्त माहितीच्या आधारे हॉटेल ताडोबा अतिथी इन येथे छापा टाकला असता, आरोपीलकी उर्फ लक्ष्मण रामसिंह शर्मा (वय २६), रा. अलवर, राजस्थान हा हॉटेलमध्ये एका




पिडीत महिलेकडून स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता वेश्या व्यवसाय करुन उपजीविका करत असल्याचे निष्पन्न झाले. यावरुन रामनगर पोलीस स्टेशन येथे कलम ३,४,५, व ७ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची महत्वपूर्ण आणि यशस्वी कारवाई मुमक्का सुदर्शन पोलीस अधीक्षक चंद्रपूर, आणि ईश्वर कातकडे अप्पर पोलीस अधीक्षक, चंद्रपूर, यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकामध्ये विशेष पोलीस अधिकारी अमोल काचोरे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर, पोउपनि संतोष निंभोरकर, पोउपनि सुनील गौरकर, सफो. धनराज करकाडे, पो. हवा. सुरेंद्र महतो, दिपक डोंगरे, पोअ प्रफुल गारघाटे, सुमित बरडे, शषांक बादामवार, किशोर वाकाटे, हिरालाल गुप्ता, चालक मिलिंद टेकाम, महिला पोलीस छाया निकोडे, अपर्णा मानकर, उषा लेडांगे, निराशा तितरे, यांचा समावेश होता. या कारवाईमध्ये समाजसेविका सरिता मालू, रेखा भारसाकडे, आणि एनजीओ चंद्रपूर यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

**• हॉटेल व्यावसायिकांना पेलिसांचे आवाहन**

सर्व लॉजिंग हॉटेल व्यावसायिकांनी अशाप्रकारे अवैध कुंटणखाना चालवू नयेत. जर कोणत्याही हॉटेलमध्ये अशा प्रकारचा अवैध ध्दंदा चालवितांना आढळून आला, तर संबंधित व्यक्ती आणि आस्थापनांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईलं.

## संपादकीय

### कर्जमाफी होईल, पण...

बच्चू कडू, राजू शेट्टी आणि अजित नवले हे शेतकरी नेते आणि शेतकरी संघटनांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनामुळे येत्या ३० जूनपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना करावी लागली. मुळात लाडकी बहीण योजना आणि शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनांच्या जोरावरच महायुतीला राज्यात सत्तेचा सोपान गाठता आला. योगायोगाने याच महिन्यात सरकारची वर्षपूर्ती होणार असल्याने बारा महिन्यांच्या कारभाराचे प्रगतिपुस्तक सत्ताधाऱ्यांना मांडावे लागेलच. निवडणूक काळातील शेतकरी वीजबिल माफीसह आणखी बरीच आश्वासने प्रलंबित असली; तरी वरील दोन्ही प्रमुख घोषणांची पूर्तता केल्याचा दावा करून महायुती सरकार स्वत:ची पाठ नक्कीच थोपटून घेईल. 'सबका साथ, सबका विकास' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीचाच हा भाग असल्याचे पुन्हा पुन्हा सांगितले जाईल. महिला व दीनदुबळ्या वर्गासह शेतकऱ्यांसाठी आपले सरकारच मसीहा असल्याचे दाखवून देण्याचेही प्रयत्न होतील.

अलीकडे राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांच्या अंगात श्रेयवादाचा गुण पुरता भिनल्याने त्याबद्दल हरकत असण्याचेही कारण नाही. परंतु, 'लाडक्या' बहिणींना ओवाळणी देतादेता आर्थिक बेजार झालेल्या सरकारला या नव्या योजनेसाठी साधारण पंचवीस ते तीस हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार, एवढे नक्की! अलीकडे कर्जमाफी योजनांशी केंद्राचा संबंध उरला नसल्याने आधीच रित्या झालेल्या तिजोरीत या रकमेची जुळवाजुळव करण्याचे आव्हान राज्याला स्वबळावरच पेलावे लागेल. गत वर्षभराचा अनुभव लक्षात घेता विकासकामे वा अन्य घटकांच्या पैशांत काटछाट करून ही आर्थिक जुळवणी केली जाईल. परंतु, नव्या कर्जमाफीने शेतकरी अल्पकाळ सुखावणार असले तरी बँकांवर मात्र विपरीत परिणाम होण्याचा धोका उद्भवतो. खासकरून आर्थिक संकटात सापडलेल्या, उर्जितावस्थेसाठी धडपडणाऱ्या सहकारी बँकांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते, हे सांगण्यासाठी आर्थिक जाणकार वा तज्ज्ञाची अजिबात आवश्यकता नाही.

आजमितीस राज्यातील अशा आठ-दहा जिल्हा बँकांच्या अडचणी अधिक वाढणार आहेत. एकट्या नाशिक जिल्ह्याचा विचार केल्यास मागील सात-आठ वर्षांपासून दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे आता काय होणार, हा प्रश्न पुन्हा उपस्थित होतो आहे. वसुली मोहीमच थंडावणार असल्याने 'दुष्काळात तेरावा महिना' अशी तिची अवस्था होणार आहे. मरणासन्न अवस्थेतील या संस्थेच्या बहुचर्चित सामोपचार योजनेला (ओटीएस-वन टाइम सेटलमेंट) आज बरोबर तीन महिने पूर्ण होत आहेत. सुमारे ३५ हजार सभासद योजनेसाठी पात्र ठरले खरे; परंतु अवघ्या तीन हजार सभासदांनी 'हो-नाही' करीत ३६ कोटी रुपयांच्या थकबाकीचा भरणा केला. ही रक्कम थकबाकीच्या डोंगराच्या तुलनेत अत्यल्प व असमाधानकारक असली तरी बँकेला मात्र 'बुडत्याला काडीचा आधार' याप्रमाणे सहाय्यभूत ठरणार होती. काही महिन्यांपूर्वी नागपूर जिल्हा बँकेचे पुनरुज्जीवन करून बँकिंग क्षेत्रात आदर्श निर्माण करणारे अर्थतज्ज्ञ विद्याधर अनास्कर प्रशासक प्रमुख म्हणून लाभले. त्यांचे आटोकाट प्रयत्न व जोडीला 'ओटीएस'च्या माध्यमातून जोमाने वसुली होऊन नाशिक जिल्हा बँक पुन्हा सक्षम होऊ शकेल, असा आशावाद व्यक्त होत होता. मुद्दल व व्याज मिळून सुमारे तेवीसशे कोटी रुपयांची सभासदांची थकबाकी असल्याने शासनाकडे ६७२ कोटींच्या भागभांडवलाची मागणीही प्रशासक मंडळ व सभासदांनीही मधल्या काळात केली.शिखर बँकेच्या माध्यमातून ही आर्थिक मदत मिळेल तेव्हा मिळेल तोवर 'ओटीएस'च्या माध्यमातून मार्चपर्यंत किमान दीडएकशे कोटींची वसुली होण्याची अपेक्षा होती. परंतु, आता कर्जमाफीची घोषणा झाल्याने प्रशासकांच्या प्रयत्नांवर पाणी फेरून ती फोल ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

कर्ज माफ होण्याच्या अपेक्षेने छोट्या-मोठ्या थकीत कर्जदारांकडून या वित्तीय संस्थेला ठेंगा दाखवला जाऊ शकतो. त्यात चालू वर्षात बँकेने ३७१ कोटींचे कर्जवाटप केलेले आहे. ही मंडळीसुद्धा कर्ज भरण्याची शक्यता नाही. त्यामुळे पुढील वर्षात हे कर्ज वितरणही अशक्यप्राय होईल.

# जेमिमाह रॉड्रिग्स : आत्मविश्वास, प्रतिभा आणि नव्या भारतातील स्त्रीशक्तीचं प्रतीक

**जेमिमाह रॉड्रिग्स हे भारताच्या महिला क्रिकेट संघातील एक चमकदार आणि आशादायी खेळाडू आहे. ५ सप्टेंबर २००० ला मुंबई येथे जन्मलेल्या जेमिमाहने कमी वयातच क्रिकेटमध्ये आपली ओळख निर्माण केली आहे. भारतीय महिला क्रिकेटचा चेहरा बदलणाऱ्या नव्या पिढीत एक नाव तेजाने झळकतं ते जेमिमाह रॉड्रिग्स. तिच्या बॅटमधून निघणारा प्रत्येक चौकार केवळ धावसंख्या वाढवत नाही, तर तो प्रत्येक भारतीय मुलीच्या मनात उमटणाऱ्या मीही करू शकते या विश्वासाचा स्वर आहे.**

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात जन्मलेली मुंबईच्या भांडूप भागात वाढल्या, सामान्य कुटुंबातून आलेली जेमिमाहच्या कुटुंबाने नंतर बँड्रा वेस्टमध्ये स्थलांतर केले, कारण तिथे खेळासाठी उपयुक्त सुविधा अधिक होत्या. तिच्या वडिलांनी स्वतः शाळेत मुलींसाठी क्रिकेट टीम तयार केली. कारण त्यांना आपल्या मुलीला संधी हवी होती. हीच होती त्या लहानशा स्वप्नाची पहिली पायरी. मैदानावर बॅट हातात घेताना तिच्या डोळ्यांत धडाडी होती, पण चेहऱ्यावर नम्रता होती, हाच तिच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा. क्रिकेट व्यतिरिक्त तिला हॉकीमध्येही रुची होती आणि तिने महाराष्ट्रातील ण१७ हॉकी संघातही भाग घेतला होता. जेमिमाहने केवळ वयाच्या १७व्या वर्षी भारतासाठी पदार्पण केलं. त्या वयात जिथे अनेक जण अजून दिशा शोधत असतात, तिथे तिने देशाचं प्रतिनिधित्व केलं. तिच्या फलंदाजीमध्ये आक्रमकता आहे, पण त्याचवेळी ती तर्कशुद्ध आहे. तिचा टायमिंग, कव्हर ड्राइव्ह आणि स्मार्ट रोटेशन ऑफ स्ट्राइक हे आजच्या जागतिक दर्जाच्या महिला क्रिकेटमध्ये उदाहरण ठरत आहेत.

जेमिमाह ने २०१८ साली ढ२० आणि जूख कार्यक्षमतेत आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. उजव्या हाताने फलंदाजी करणारी आणि अफ-ब्रेक गोलंदाजीही थोडी केली आहे. तिने अनेक उल्लेखनीय कामगिरी केल्या आहेत. उदाहरणार्थ २०१७ साली ५० ओव्हर खेळात महिला क्रिकेटमध्ये दुय्यम महिलेत दोनशे रन गाठणारी खेळाडू होती. तसेच २०१९ साली थेशप'ी ढ२० उहरश्रश्रशपसश मध्ये त्यांनी 'सुपरनोव्हास' संघासाठी सर्वाधिक रन्स केल्या आणि 'प्लेयर ऑफ द सीरीज' बनल्या. तिच्या कामगिरीमुळे भारतीय महिला क्रिकेटला नवीन ऊर्जा प्राप्त झाली आहे. तिची फलंदाजी केवळ धावा मिळवण्यापुरती नाही, तर संघाच्या विजयासाठी निर्णायक ठरतेय. जेमिमाह आपल्या कौशल्याने तसेच मैदानाबाहेरही एक प्रेरणा बनली आहे. ती तरुण खेळाडूंसाठी मी ही करू शकतो अशी भावना जागृत करते. मोठ्या दडपणाखाली खेळणे, सार्वजनिक अपेक्षा आणि झपाट्याने बदलणाऱ्या ग्लोबल क्रिकेट स्पर्धांमध्ये टिकणे. हे सर्व जेमिमाहसारख्या तरुण खेळाडूंसमोर मोठे आव्हान आहे. तथापि, त्यांच्या विकासाची गती आणि तिच्या कामगिरीतील सातत्य पाहता, भविष्यात अजून मोठी कामगिरी करण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

पण हा प्रवास इतकाच गोड नव्हता. कधी संघातून





बाहेर पडणं, कधी खराब फॉर्म, तर कधी सोशल मीडियावरील टीका, हे सर्व तिने सामोरं घेतलं. मात्र प्रत्येक वेळी ती परत आली अधिक परिपक्व, अधिक ठाम. भारतीय महिला क्रिकेट आता फक्त 'पुरुष क्रिकेटची सावली' राहिलेलं नाही. स्मृती मंधाना, हरमनप्रीत कौर, दीप्ती शर्मा, आणि जेमिमाह रॉड्रिग्स यांसारख्या खेळाडूंनी या क्षेत्राला नवसंजीवनी दिली आहे. जेमिमाह केवळ खेळत नाही, ती प्रतिनिधित्व करते. त्या सर्व मुलींचं, ज्यांनी समाजाच्या संकुचित चौकटी मोडून आपलं स्वप्न निवडलं. ती केवळ खेळाडू नाही, तर एक सच्ची प्रेरणा आहे. तिच्या हसण्यात आत्मविश्वास आहे, आणि तिच्या वागण्यात साधेपणा. मैदानावर ती जशी झुंजते, तशीच ती जीवनातही आशावादाची झुंज देते. तिचे सोशल मीडियावरील संवाद, संगीताची आवड, आणि धर्मावरील विश्वास. हे सर्व तिच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवतात.

काल तिचा एकेक चौकार तिला ट्रोल करणार्या भक्तडुक्कर पिलावळीच्या सणसणीत मुस्काडात लगावल्यासारखा बसत होता. तिला जवळजवळ आयुष्यातून उठवण्याचा प्रयत्न केला होता हराम्यांनी. दुसर्याचं करीयर बरबाद होण्यात आनंद मानणं हे त्यांच्या पिढीजात नासक्या रक्तातच आहे.

काही महिन्यांपूर्वी जेमिमाच्या वडिलांवर बेसलेस खोटे आरोप करून या पिलावळीनं तिचं खार जिमखाना सदस्यत्व रद्द करायला लावलं. 'ती ख्रिश्चन आहे' हा जणू तिचा दोष आहे, अशी वागणूक तिला दिली गेली. तिचं करियर संपवण्याचा घाट घातला. या नालायक जमातीच्या जिवघेण्या ट्रोलींगनं ती खचली. 'गँगरेप'सारख्या धमक्यांनी ती डिप्रेशनमध्ये गेली. तिनं क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला. तिचे कुटूंबीय आणि कोच तिच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. मानसोपचार तज्ञाची मदत घेऊन तिला पुन्हा उभं केलं. काल तिनं अक्षरश: डोळे दिपवणारा खेळ करून आपल्या देशाला वर्ल्डकप फायनलची जवळजवळ बंद झालेली दारं उघडी करून दिली ! सेमीफायनलला ३३८ धावांचा डोंगर पार करणं खायचं काम नव्हतं. जेमिमानं नाबाद शतक करून सात वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला लांब फेकून दिलं... त्याचबरोबर भक्ताडांच्या ट्रोलिंगलाही सातासमूद्रापल्याड भिरकावून दिलं ! तिची ही खेळी पुरूष आणि स्त्रियांच्या वर्ल्ड कप नॉकआऊट फेरीमधली आजवरची रेकॉर्ड ब्रेक खेळी ठरली आहे. एवढंच नाही, तर जगभरातल्या महिला क्रिकेटसाठी ही ऐतिहासिक खेळी आहे.

जेमिमाह हे केवळ एक उत्तम फलंदाज नाही, तर आधुनिक महिला क्रिकेटमध्ये बदल घडवू शकणाऱ्या व्यक्तिमत्वाचं प्रतीक आहेत. तसेच जेमिमाह ही केवळ एक क्रिकेटपटू नाही; तर ती नव्या भारतातील स्त्रीशक्तीचं जिवंत प्रतीक आहे. तिची कहाणी दाखवते की कसोटी, मेहनत, आणि आत्मविश्वास यांचं संगम कसा महान क्षात्रांसाठी मार्ग खुलवतो. पुढच्या काळात त्यांनी खेळाच्या प्रत्येक अंगावर आपली छाप सोडावी, अशी आशा बाळगावी. तिच्या बॅटमधून निघणाऱ्या प्रत्येक धावेसोबत भारतातील हजारो तरुणींना दिशा मिळते, आत्मविश्वास मिळतो, आणि समाजाला एक नवीन संदेश मिळतो. संधी दिली, तर मुलीही इतिहास घडवू शकतात.

जेमिमाह, आज संपुर्ण भारत देशाला आणि प्रत्येक खर्याखुर्या भारतीयाला तुझा अभिमान आहे. तू आमच्या देशाची शान आहेस. आमचा देश प्रत्येक देशवासियाच्या धर्माचा, जातीचा, पंथाचा, वंशाचा आदर करणारा आहे. संविधानानं दिलेली समता आणि बंधुता जपणारा आहे. धर्माचा आणि देशाचा ठेका घेऊन जबरदस्ती करू पहाणार्या भिकारड्यांना तू आज खर्या अर्थानं दाखवून दिलंस की,किसी के बाप का हिंदोस्तान थोडी ही है?

**जय हिंद !**

**- प्रवीण बागडे**
**नागपूर मो.क्र.९९२३६ २०९११९**

## श्रध्दांजली..

श्रद्धांजली द्यायला
दोनचं मिनीटे उभे
अस्वस्थ होई कसे
सतत घड्याळ बघे

जाणारा तो परका
अथवा असू दे सगे
नक्राश्रू ढाळून चार
सांत्वन करतो उगे

सोपस्कार गाठभेट
जे आप्तउरले मागे
नको बेगडी मदती
रे कोणआधार मागे
कसा गेला जाणारा
उत्सुकताजाई शिगे
चाकोरीबद्ध सवाल
भेटून तात्काळ निघे

शव वाहिका असते
आता ना लागे चौघे
विद्युत दाहिनी मुळे
वेळ जराही न लागे

सुट्टी दिवशीचं गेला
शिव्या घालतात टगे
कोण ये तुमच्यावेळी
सुज्ञाससांगणे नलगे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# प्रदूषणाने झालेले मृत्यू म्हणजे सार्वजनिक आरोग्य संकट

देशाची राजधानी असलेली दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर असल्याचा एक अहवाल मध्यंतरी आला होता. आता दिल्लीची विषारी हवा लोकांचा जीव घेत असल्याचे धक्कादायक अहवाल समोर आला आहे. दिल्लीतील सुमारे १५ टक्के रहिवासी प्रदूषणामुळे मरत आहेत. एका अभ्यासातून उघड झालेला हा अहवाल धक्कादायक आहे. हे आकडे २०२३ मध्ये अपेक्षित मृत्यूंवर आधारित आहेत. इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हाल्युएशनने १ नोव्हेंबर रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार २०२३ मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी १७ हजार १८८ रहिवाशांचा मृत्यू प्रदूषणामुळे झाला. याचाच अर्थ राजधानीत प्रत्येक सात पैकी एक मृत्यू हा प्रदूषणामुळे होतो. हा अहवाल धक्कादायकच आहे. जर वर्षाला प्रदूषणामुळे १५ टक्के मृत्यू एकट्या दिल्लीत होत असतील तर देशात किती लोकांचा मृत्यू प्रदूषणामुळे होत असेल याची कल्पनाच न केलेली बरी. उच्च रक्तदाब आणि मधुमेहापेक्षाही प्रदूषणाने अधिक मृत्यू होतो याला सार्वजनिक आरोग्य संकट म्हंटले पाहिजे.

दिल्लीतील प्रदूषणाने धोक्याची पातळी केंव्हाच ओलांडली आहे. म्हणूनच दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे देशाची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही दिल्लीतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा इशारा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला दिला होता मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले.

केवळ दिल्लीतच नाही तर दिल्लीसह देशातील प्रमुख शहरांनीही प्रदूषणाची धोक्याची पातळी ओलांडली आहे. दिल्लीप्रमाणेच मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता देखील खालावली आहे. दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांना प्रदूषणाचा विळखा पडला आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले आहे.

आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. मागील वर्षी प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली आली होती.

देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही.

या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे.


वर्षाला १५ टक्के मृत्यू प्रदूषणाने होतात हा अहवाल धोक्याचा इशारा देणारा आहे. यावर वेळीच उपाय केले नाही तर ही आकडेवारी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळेच वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल आणि प्रदूषणामुळे होणारे मृत्यूही कमी करता येईल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पाटण येथे होणार ७ नोव्हेंबरला एकाचवेळी वंदेमातरम गीतगायन



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०२, पाटण (सातारा) :** राष्ट्रीय गीत वंदेमातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त ७ नोव्हेंबर २०२५ रोजी वंदेमातरम गीत वर्धापन दिन संपूर्ण राज्यात एकाच वेळी साजरा करण्यात येत आहे. हे गीत एकाच वेळी गायनाचे वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा शासनाचा मानस आहे. यावेळी पाटण तालुक्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कौशल्य विद्यापीठ व कौशल्य विकास केंद्र, शाळा, महाविद्यालय, नागरिक यांचा समावेश होणार असल्याचे हणमंत नलावडे कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी सातारा यांनी तहसिलदार पाटण यांच्या दालनात झालेल्या समिती बैठकीत सांगितले.

यावेळी हणमंत नलावडे पुढे म्हणाले, वंदेमातरम गीतास स्वातंत्र्य लढा आणि राष्ट्रीय आंदोलनाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या गीतास ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाच्या घटनेच्या निमित्ताने वंदेमातरम गीत गायन, देशभक्तीपर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी साडेदहा वाजता वंदेमातरम गीत वर्धापन दिन संपूर्ण राज्यात एकाच वेळी साजरा करण्यात येत आहे. हे गीत एकाच वेळी गायनाचे वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा शासनाचा मानस आहे. यावेळी पाटण तालुक्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कौशल्य विद्यापीठ व कौशल्य विकास केंद्र, शाळा, महाविद्यालय, नागरिक यांचा समावेश होणार असे नलावडे यांनी सांगितले. यावेळी समिती सदस्य पोलिस निरीक्षक अविनाश कवठेकर, नायब तहसिलदार एस.बी.भालेकर, शिक्षण विस्तार अधिकारी दैवता पाटणकर, मनोहर यादव, शंकर मोहिते, प्रा.पांडुरंग ऐवळे, मारुती लोहार, महेंद्र चव्हाण, निलेश घोणे, रोहित मिसाळ, लकी लांबोर, भाग्यश्री कवडे, सुरेखा कुंभार, मनिष मोरे यांची उपस्थिती होती.

## लोणी मावळा येथे विविध विकासकामांचे भुमिपूजन संपन्न



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यापासून मतदारसंघातील विकासकामांचा वाढलेला वेग आपण सर्वजन अनुभवत आहात. कुठलेही जनहिताचे काम मार्गी लावायचे असल्यास सत्ताकेंद्रे ही समविचारी सहकाऱ्यांच्या ताब्यात असणे आवश्यक आहे. त्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या माध्यमातून जनतेने जनहिताला प्राधान्य देणाऱ्या पदाधिकाऱ्यांची शृंखला तयार केल्यास विकासाचा वेग दुप्पट वाढेल, असे मत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी लोणी मावळा येथे १ कोटी ९ लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या भुमिपूजन प्रसंगी व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आर.एस. कापसे सर, संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ, युवक राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाध्यक्ष रेश्मागलांडे, ओ.बी.सी.सेलचे तालुकाध्यक्ष नितीन घोलप, शिवराज कदम, अतुल माने, तुकाराम येवले, राहुल नरड, आशिष शेख, संतोष कापसे आदी मान्यवरांसह सरपंच मंदाताई शेंडकर, उपसरपंच मोहन कामठे, प्रविण लोळगे, देवराज शेंडकर, माजी सरपंच अशोक शेळके, कैलास गोरडे, नटराज मापारी, स्वप्निल मावळे, भाऊसाहेब पडवळ, सचिन जगदाळे हे स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.

भुमिपूजन करण्यात आलेल्या कामांमध्ये वाघमारे वस्ती-शेळके मळा रस्ता कांक्रीटीकरण (१० लाख रुपये), हनुमानवाडी रस्ता (१० लाख रुपये), महादेव मंदिर रस्ता (१० लाख रुपये), पठाणवस्ती-खारवळ मळा येथील नवीन विद्युत रोहित्र (७ लाख रुपये), अळकुटी-पारनेर रोड ते जगदाळे मळा रस्ता सुधारणा (२२ लाख रुपये), शिरापूर-पाबळ-लोणी मावळा-चासकर वाडी ते कारखाना रस्ता (२० लाख रुपये), लोणी मावळा ते दरोडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण (२० लाख रुपये) आणि कापसे-मापारी मळ्यातील हनुमान मंदिर परिसरातील सभामंडप ( १० लाख रुपये) असा एकूण २ कोटी ९ लाख रुपयांच्या विकासकामांचा समावेश आहे.

## वेकोलि शेतकरी, विस्थापित व कामगारांच्या प्रश्नांवर नागपूर येथे बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** माजी आमदार अॅड. वामनराव चटप यांच्या नेतृत्वात नागपूर येथे वेकोलिचे चेअरमन-कम-मॅनेजिंग डायरेक्टर जयप्रकाश द्विवेदी यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अॅड.दीपक चटप व दीपक देरकर हे देखील उपस्थित होते. बैठकीत वेकोलि क्षेत्रातील शेतकरी, विस्थापित आणि स्थानिक कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर ठोस चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान माजी आमदार अॅड. वामनराव चटप यांनी सात प्रमुख मुद्दे उपस्थित केले. सध्याच्या परिस्थितीत पडीत जमीनसाठी ६ लाख, कोरडवाहू जमीनसाठी ८ लाख व ओलित जमीनसाठी १० लाख मोबदला अपुरा असल्याने, तो वाढवून किमान २५ ते ४० लाख रुपये प्रति एकर करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच वेकोलिमधील 'नातू' प्रमाणे 'नातीन' लाही रोजगार देण्याचा नियम तत्काळ लागू करण्याची मागणी करण्यात आली. सास्ती, पोवणी, बाबापुर आदी भागांतील उर्वरित शेती अधिग्रहण प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना योग्य मोबदला वितरित करावा. तसेच सास्ती, कोलगाव, पोवणी, गाडेगाव आणि इतर प्रभावित गावांचे पुनर्वसन करताना मूळ जमिनीवरील ताबा निश्चित करून सोयीसुविधायुक्त पुनर्वसन प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. वेकोलीने वर्धा नदी पात्रावर टाकलेले ओव्हर डंप हटवावे, असेही स्पष्टपणे सांगण्यात आले. तुकडेबंदी कायद्याचे कारण सांगून थांबवलेल्या नोकऱ्यांचा तातडीने निर्णय घ्यावा असेही सांगण्यात आले.

याशिवाय, सेक्शन ९ नंतर अधिग्रहित जमिनीवर न्यायालयात दावा दाखल झाला असला तरी 'स्टे ऑर्डर' नसल्यास शेतकऱ्यांना रोजगार देण्याची कारवाई थांबवू नये, अशी मागणी करण्यात आली. आउटसोर्स कॉन्ट्रॅक्टरमार्फत दिल्या जाणाऱ्या कामांत संबंधित तालुका किंवा जिल्ह्यातील ८० टक्के स्थानिकांना रोजगार देणे बंधनकारक करावे, अशी ठोस मागणीही करण्यात आली. बैठकीत मांडलेल्या सर्व मुद्द्यांवर सीएमडी जयप्रकाश द्विवेदी यांनी सकारात्मक दृष्टीकोन दाखवत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे पांडुरंगाला साकडं

### मानाचे वारकऱ्यांना एसटीचा मोफत पास; एक वर्षा ऐवजी कायमस्वरूपी देण्याची उपमुख्यमंत्री यांची घोषणा



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०२, पंढरपूर (सोलापूर) :** श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी भाविकांना कमी वेळ लागावा तसेच दर्शन रांगेमध्ये पाणी, बैठक व्यवस्था यासह सर्व प्रकारच्या सुविधा मिळावी. याकरिता तिरुपतीच्या धर्तीवर दर्शन मंडप निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने १३० कोटीचा निधी मंजूर केलेला होता.

या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून प्रशासनाने हे काम अत्यंत जलद गतीने पूर्ण करून भाविकांना दर्शनाची सुविधा सुलभ व कमी वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कार्तिकी यात्रा २०२५च्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी रामराव वालेगावकर यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी एकनाथ शिंदे बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, अभिजीत पाटील, तानाजी सावंत, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व समिती सदस्य तसेच समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, पंढरपूर येथे आषाढी व कार्तिकी वारीमध्ये लाखो भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. भाविकांना दर्शन रांगेत चांगल्या सुविधा मिळण्याबरोबरच कमी वेळेत दर्शन होण्यासाठी दर्शन मंडप काम गतीने होणे गरजेचे आहे यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी.

श्री विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद केलेले असून वारकऱ्यांना लवकर दर्शन मिळत आहे. कारण वारकरी हाच व्हीआयपी असल्याचे त्यांनी सांगून वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने चांगले नियोजन केल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील शेतकऱ्यावर मोठे संकट आलेले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे खूप मोठे नुकसान झालेले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून शासनाने ३२ हजार कोटीचे पॅकेज जाहीर केलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी समितीची स्थापना केल्याची माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. बळीराजावर आलेले अरिष्ट दूर कर, त्यांना सुख व समाधानाचे दिवस येऊ दे, असे साकडं पांडुरंगाला घातले असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

राज्य परिवहन महामंडळ मार्फत मानाच्या वारकऱ्यांना वर्षभर एसटीने प्रवास करण्यासाठी मोफत पास दिला जातो. यापुढील काळात या वारकऱ्यांना कायमस्वरूपी एसटीचा मोफत पास देण्यात येणार आहे. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे असलेली महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाची जागा आणखी पुढे तीस वर्ष राहील असा करार लवकरच करण्यात येणार आहे. तसेच सर्वे नंबर १६१ मधील जागा मंदिर समितीला देण्याबाबतचा प्रस्ताव पुढील महिन्यात नगर विकास विभागाला सादर करावा, याबाबतचाही निर्णय तात्काळ घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

आपल्या राज्याने सर्व क्षेत्रात उत्कृष्ट काम करून प्रथम क्रमांकावर राहावे, विविध कल्याणकारी योजनाची प्रभावी अंमलबजावणी करून राज्याच्या विकासाची पताका सर्वत्र फडकावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्याप्रमाणेच चंद्रभागा नदीसह सर्व नद्यांच्या प्रदूषण मुक्तीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे.

यावर्षीच्या कार्तिकी वारीमध्ये भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त पाच कोटींचा निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात आल्याचेही शिंदे यांनी सांगून राज्यातील सर्व भाविकांना कार्तिकी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या तसेच मानाच्या वारकऱ्यांचे अभिनंदन केले व या यात्रा कालावधीत पालकमंत्री, जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार व स्थानिक प्रशासन यांनी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी रामराव वालेगावकर व त्यांच्या पत्नी. सुशिलाबाई रामराव वालेगावकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली.

यावर्षी प्रथमच कु. मानसी आनंद माळी व आर्य समाधान थोरात या दोन शालेय विद्यार्थ्यांची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आलेली होते. यावेळी उपमुख्यमंत्री व सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने तयार केलेल्या दैनंदिनी २०२६ चे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले तर आभार कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मानले.

## सुर्डी येथील ज्ञानेश्वर डोईफोडे, अक्षय काळे दोघांनी मिळवले एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश





**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०२, बार्शी (सोलापूर) :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेचा निकाल नुकताच लागला. यामध्ये बार्शी तालुक्यातील सुर्डी येथील ज्ञानेश्वर सुभाष डोईफोडे यांनी १३५ वी रँक मिळवून घवघवी यश मिळवले.

सुर्डी सह परिसरातील गावात सोयी सुविधा उपलब्ध नसतानाही शिक्षणाची कास धरून अधिकारी होणे हे फार मोठी गोष्ट आहे. हेच बार्शी तालुक्यातील सुर्डी गावातील ज्ञानेश्वर डोईफोडे व अक्षय काळे यांनी १००वी रँक घेत साह्यक आयुक्त स्टेट टॅक्स या क्लासवन पोस्ट काढून दाखवले, ज्ञानेश्वर डोईफोडे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा सुर्डी व माध्यमिक शिक्षण दिलीपराव सोपल विद्यालय सुर्डी येथे झाले आहे.

महाविद्यालयीन शिक्षण शेळगाव येथे झाले ज्ञानेश्वर डोईफोडे हे २०१६ पासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत आहेत आतापर्यंत त्यांनी ३५ वेळा मेन्स दिली होती. परंतु त्यांना अपयश येत होते. त्यांना २०२४ मध्ये ग्रामविकास अधिकारी म्हणून यश मिळाले, त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चालू ठेवला आणि २०२५ मध्ये क्लासवन पोस्ट काढली आहे.

मनामध्ये जिद्द आणि ध्येय पूर्ण करण्यासाठी लागणारी उर्मी असेल तर तुमची आर्थिक किंवा कौटुंबिक परिस्थिती कशीही राहू द्या त्याचा कुठल्याही प्रकारचा परिणाम व्यक्तीवर होत नाही व तो अखंड ध्येय पूर्ण करण्याच्या आसक्तीने त्या दृष्टिकोनातून अपार कष्ट करतो व यश मिळवतो. तसे पाहायला गेले तर जीवनामध्ये अशी कुठलीही गोष्ट नाही कि ती माणसाला आयुष्यभर रखडवून ठेवले किंवा यशापासून दूर ठेवले.

कारण परिस्थिती ही बदलत असते. परंतु त्यासाठी तुम्हाला खूप मोठ्या प्रमाणावर नियोजन करून कष्ट देखील करावे लागतात व त्यातून मार्ग काढून यशाचे शिखर गाठावे लागते. याच अनुषंगाने जर आपण विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांचा विचार केला तर असंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी या परीक्षांची तयारी करतात. म्हटले जाते की या परीक्षांच्या तयारीसाठी खूप व्यवस्थित पद्धतीचे वातावरण किंवा कोचिंग क्लासेसची आवश्यकता असते असे ज्ञानेश्वर डोईफोडे यांनी सांगितले.

## डहाणूच्या कन्येची एमपीएससीमध्ये बाजी; आदिवासी महिला प्रवर्गात द्वितीय क्रमांक




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०२, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील दाभोण, (म्हसकर पाडा) येथील अँड. प्रियांका अनंता म्हसकर हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आदिवासी महिला प्रवर्गात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तिच्या या यशामुळे डहाणू तालुक्याचे नाव संपूर्ण जिल्ह्यात गौरवाने उजळले आहे. या यशाबद्दल तिचा प्रोत्साहन सत्कार कार्यक्रम नुकताच ऐना येथील ग्राममंगल सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास परिसरातील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

प्रियांकाचे प्राथमिक शिक्षण टिटवाळा येथील राष्ट्रीय विद्यालयात झाले. तिने दहावीमध्ये ९३.४० टक्के तर बारावीमध्ये ७८ टक्के गुण मिळवले. त्यानंतर तिने चर्चगेट येथील गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून एलएलबी पदवी पूर्ण केली. शिक्षणासोबतच तिने स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवत आपले ध्येय साध्य करण्यासाठी अपार मेहनत घेतली. दोन वर्षांपूर्वीच तिला झडख (पोलीस उपनिरीक्षक) पदासाठी निवड झाली होती. मात्र, मोठे स्वप्न उराशी बाळगून तिने ती सेवा न करता एमपीएससीकडे लक्ष केंद्रित केले. मागील वर्षी तलाठी पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन डहाणू येथे कार्यरत असतानाही तिने अभ्यासाची सातत्यपूर्ण मेहनत ठेवून यावर्षी उल्लेखनीय यश मिळवले आहे.

प्रियांकाच्या यशाबद्दल झालेल्या या सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते अँड. विराज गडग यांनी प्रियांकाला शाल आणि गुलाबपुष्प देऊन सत्कार केला व तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी व्यक्त केले की, ग्रामीण भागातील समस्या व अडचणींवर काम करण्याची संधी प्रियांकाला मिळाली असून, ती एक जबाबदार प्रशासक म्हणून आदिवासी व इतर समाजाला न्याय देईल, असा विश्वास आहे.

शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे साहेब यांनी प्रियांकाला भारतीय संविधानाची प्रत भेट देत शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यांनी सांगितले, तू संविधानिक मूल्यांवर आधारित न्यायप्रिय अधिकारी बनशील, अशी अपेक्षा आहे.

कार्यक्रमात प्रियांकाचे वडील शिक्षक अनंता म्हसकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, लहानपणापासूनच तिला अभ्यासाची आवड होती. आई-वडिलांच्या संस्कारांमुळे आणि तिच्या चिकाटीमुळेच आज हे यश तिच्या पदरी आले आहे.

या कार्यक्रमासाठी दाभोण, ऐना, रनकोळ, वनई, चंद्रनगर, सारणी आणि आंबिवली परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अँड. विराज गडग, शिलिंद लहागे, संजय रावते, पांडू डुकले यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार म्हसकर सरांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. प्रियांकाच्या या यशामुळे दाभोण व परिसरात आनंदाचे वातावरण आहे. तिच्या यशाचा प्रवास अनेक तरुण-तरुणींसाठी प्रेरणादायी ठरला आहे. स्वतःच्या मेहनतीने, चिकाटीने आणि ध्येयावर ठाम राहून प्रियांकाने दाखवून दिले की, ग्रामीण भागातूनही मोठी स्वप्नं पूर्ण होऊ शकतात.

# लासलगाव बाजार समितीची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

## शेतकरी कुटुंबाचा प्रमुख म्हणून सेवाभाव - सभापती ज्ञानेश्वर (डी.के.) जगताप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** लासलगाव बाजार समिती म्हणजे केवळ संस्था नसून शेतकरी, व्यापारी, अडते, माथाडी/मापारी कामगार, कर्मचारी आणि सर्व मार्केट घटकांचे एक संयुक्त कुटुंब आहे. त्यामुळे सभापती म्हणून नव्हे, तर या कुटुंबाचा प्रमुख म्हणून सर्वांना उत्तम सुविधा देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत केले. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी प.पू. भगरीबाबा मंदिर सभामंडपात झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी जगताप होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी बाबांच्या मुर्तीस व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.



प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुनिल डचके यांनी केले. मागील सभेचे इतिवृत्त, आर्थिक पत्रके व लेखापरीक्षण अहवाल सदस्य सचिव नरेंद्र वाढवणे यांनी वाचले. यावेळी विविध प्रतिनिधींनी बाजार समितीच्या दैनंदिन कामकाज व सुधारणा विषयक सुचना मांडल्या.

सभेतील मार्गदर्शनात जगताप म्हणाले की, ०१ एप्रिल १९४७ पासून आजवर बाजार समितीने शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवून विकासाची वाटचाल केली. पारदर्शक कार्यप्रणाली आणि सहकार्यामुळे लासलगावला आशियाई स्तरावर कांदा बाजारपेठेची ओळख मिळाली आहे.

अहवाल वर्षात समितीने मौजे सुभाषनगर येथील ०८ हे. ६१.५६ आर जागा संपादित केली असून रु. ११.४० कोटींची विकासकामे पूर्ण केली. मानोरी खुर्द व निफाड येथे खरेदी-विक्री केंद्रे सुरू केली. तसेच उगांव व खानगाव केंद्रासाठी जागा संपादनाचे प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याचे जगताप यांनी सांगितले. भविष्यात शेतकऱ्यांसाठी अधिक सुविधा उपलब्ध करण्यावर भर देणार असल्याचे नमूद करत, शेतमाल तारण योजना अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. आरओ प्लांट, व्हॉट्स ॲपद्वारे बाजारभाव, कामगार भवन, लिलाव शेड, इलेक्ट्रॉनिक भुईकाटा, सफाई व्यवस्था, रोख चुकवती आदी उपक्रमांची ही माहिती त्यांनी दिली. यावेळी उपसभापती संदीप दरेकर यांसह संचालक, अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, व्यापारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार सदस्य राजेंद्र डोखळे यांनी मानले.

# नकोडा येथील असंख्य कॉंग्रेस कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश

## भारतीय जनता पक्ष म्हणजे विचार, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीचा प्रवास : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** आजचा दिवस नकोडा गावासाठी आणि भारतीय जनता पक्षासाठी ऐतिहासिक आहे. आज नकोडा येथील असंख्य कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करून एक विचार, एक संस्कार आणि एका राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासाशी स्वतःला जोडले आहे. पक्ष बदलणे म्हणजे केवळ ध्वज बदलणे नव्हे, तर तो विचारांचा स्वीकार असतो. आज आपण भारतीय जनता पक्षाच्या कार्यसंघात सामील झालात, तेव्हा तुम्ही फक्त एका पक्षात नाही तर सेवा, राष्ट्रभक्ती आणि विकासाच्या प्रवासात सहभागी झाले असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले. शनिवारी नकोडा येथील असंख्य कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी आ. किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.



नकोडा येथे आयोजित या पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, जिल्हा संघटन महामंत्री नामदेव डाहुले, भाजप तालुका अध्यक्ष विनोद खेवले, भाजप नेते प्रकाश देवतळे, घुग्घूस शहर महामंत्री इमरान खान, भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अनुप भंडारी, महामंत्री मनोज पाल, सविता दंढारे, आशिष माशिरकर, राकेश पिंपळकर, दुर्गा वैरागडे, भाग्यश्री हांडे आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा केवळ सत्तेसाठीचा पक्ष नाही, तो संस्कार, सेवा आणि संघटनेचा पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची ओळख जागतिक पातळीवर मजबूत झाली आहे, तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य प्रगतीची नवी उंची गाठत आहे. जनतेच्या जीवनात परिवर्तन घडविणाऱ्या योजना गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, शेतकरी सन्मान, उज्ज्वला, जनधन, प्रधानमंत्री आवास, आयुष्मान भारत अशा अनेक उपक्रमांद्वारे आज सबका साथ सबका विकास हे ब्रीद वास्तवात उतरले आहे.

नकोडा आणि परिसरात आम्ही विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहे. प्रत्येक नागरिकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचावा, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. आज भारतीय जनता पक्षात सामील होणारे हे सर्व कार्यकर्ते म्हणजे नवीन ऊर्जा आणि नवसंजीवनी आहेत. तुमचा हा निर्णय केवळ राजकीय नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने उचललेले पाऊल असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सर्व नवनियुक्त सदस्यांच्या गळ्यात भारतीय जनता पक्षाचा दुपट्टा ओढून त्यांचे पक्षात स्वागत केले.

**कॉंग्रेसला खिंडार – विजय बावरे यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश**

मागील काही महिन्यांमध्ये कॉंग्रेसचे असंख्य कार्यकर्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहेत. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी नकोडा येथे झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात पडोलीचे विजय बावरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

विजय बावरे यांच्या पत्नी शारदा बावरे यांनी २०१७ च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवत दुसऱ्या क्रमांकाची मते मिळविली होती. त्यामुळे आता विजय बावरे यांच्या प्रवेशामुळे ग्रामीण भागात पक्षाची ताकद वाढणार आहे.

# आता 'खासगी' रुग्णालयांत ही १०८ ची सुविधा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, पुणे :** महात्मा फुले जन आरोग्य योजनेसह सरकारी योजना राबवणाऱ्या खासगी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये १०८ रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारच्या आरोग्य विभागाकडून पावलं उचलण्यात आली आहेत. रुग्णांना तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेचा (१०८ रुग्णवाहिका) विस्तार करून रुग्णवाहिकांचे एकत्रित संचलन करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून लवकरच याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.



राज्यात आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून १०२, १०४ आणि १०८ या क्रमांकाच्या रुग्णवाहिकांच्या माध्यमातून मोफत सुविधा दिली जाते. सद्यस्थितीतराज्यातीलसर्व सरकारी रुग्णालयांत या रुग्णवाहिकांच्या माध्यमातून सुविधा देण्यात येते. आपत्कालीन स्थितीत रुग्णाने विनंती केली तर जवळच्या खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांना दाखल केलं जातं. परंतु, खासगी रुग्णालयामध्ये दाखल असलेल्या रुग्णाला दुसऱ्या खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी ही सुविधा देण्यात येत नाही.

सरकारी रुग्णालयांमधून दुसऱ्या सरकारी रुग्णालयात दाखल केलं जातं. परंतु, अनेकदा आपत्कालीन परिस्थितीमध्ये गंभीर रुग्णांना लागणाऱ्या सुविधा सरकारी रुग्णालयांत उपलब्ध नसतात. त्यामुळे रुग्णांना कुठे दाखल करायचं, असा प्रश्न उपस्थितीत होतो. तसंच काही रुग्णांना खासगी रुग्णालयांत उपचार घेण्यासाठी इच्छा असते. यामुळे महात्मा फुले जन आरोग्य योजना व सरकारी योजना लागू असलेल्या रुग्णालयांतही सुविधा सुरू करण्याचा विचार आरोग्य विभागाकडून केला जात आहे. तातडीने मदत मिळणार

सरकारच्या नव्या निर्णयामुळे रुग्णांना तातडीने मदत मिळणार असून, योजनांचाही लाभ मिळू शकतो, असं आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. राज्यात आरोग्य विभागासह अन्य विभागांकडून रुग्णवाहिकांची सेवा दिली जाते. या सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित संचलन करण्याचाही विचार केला जात आहे. राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालयांत सरकारी योजना लागू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. काही रुग्णालयांनी योजना लागू करण्याला विरोध केला असून धर्मादाय रुग्णालयांना योजना लागू कराव्या लागतील, असा दावा अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

# अलिबागला जाताना सावध व्हा! 'या' पुलाचे खांब झाले जीर्ण...

**दि.०२, अलिबाग :** गेटवे ऑफ इंडिया, मुंबई आणि अलिबाग-मांडवा यांना जोडणारा महत्त्वाचा जलमार्ग आता प्रवाशांच्या जीवासाठी धोकादायक ठरत आहे. मांडवा जेट्टीवरील पुलाचे खांब जीर्ण झाल्याने आणि सिमेंट गळून लोखंडी सळया बाहेर आल्याने हा पूल कधीही कोसळू शकतो. दररोज हजारो प्रवासी या मार्गावरून प्रवास करतात, मात्र महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दुर्लक्षामुळे त्यांचा जीव धोक्यात आला आहे. काही वर्षांपूर्वी मुंबई पोर्ट ट्रस्टने बांधलेली ही जेट्टी निकृष्ट दर्जाच्या कामामुळे धोक्यात आली आहे.

मांडवा जेट्टी हा मुंबई- अलिबाग जलमार्गाचा मुख्य दुवा आहे. दररोज हजारो पर्यटक, स्थानिक प्रवासी आणि व्यावसायिक या मार्गाचा वापर करतात. पावसाळ्यात (२५ मे ते ३० ऑगस्ट) ही सेवा बंद असते, पण सप्टेंबरपासून पुन्हा सुरू झाली आहे. अलिबाग, मुरुड, काशीद



आणि श्रीवर्धनला येणारे पर्यटक वेळ आणि इंधन वाचवण्यासाठी या जलमार्गाचा उपयोग करतात. मात्र, जेट्टीवरील जीर्ण खांबांमुळे आता प्रत्येक प्रवास जीवावर बेतत आहे. सध्या मांडवा जेट्टीवर प्रवाशांसाठी कोणतीही मूलभूत सुविधा नाही. पावसात भिजत आणि उन्हात ताटकळत प्रवाशांना बोटींची वाट पाहावी लागते. पत्र्यांच्या शेडवरील लोखंडी पत्रे गंजल्याने काढण्यात आले आहेत, तर नवीन पत्रे बसवण्याचे काम संथगतीने सुरू आहे. वाऱ्यामुळे काही पत्रे सैल पडून प्रवाशांच्या अंगावर पडण्याचीही भीती आहे.

# थोडक्यात

## राज्यात कुष्ठरोग आता नोटिफायबल डिसीज; सर्व रुग्णांची नोंदणी बंधनकारक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, मुंबई :** राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावे. या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने कुष्ठरोगाला 'नोटिफायबल डिसीज' घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरीयम लेप्री या जंतुमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून त्वचा, परिघीय नसा, डोळे आणि इतर अवयवांवर त्याचा परिणाम होतो. या आजाराबद्दल समाजात अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव कायम आहेत. लवकर निदान न झाल्यास आणि उपचारात विलंब झाल्यास रुग्णांमध्ये विकृती (दर्जा २ डिसॅबिलिटी) निर्माण होते. त्यामुळे वेळेत निदान आणि संपूर्ण औषधोपचार हे कुष्ठरोग नियंत्रणाचे प्रमुख घटक असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्य शासनाने सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र हे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये संसर्गाची साखळी पूर्णपणे तोडणे, प्रसार शून्यावर आणणे, मुलांमधील विकृतीचे प्रमाण शून्य करणे आणि कुष्ठरुग्णांविषयी समाजातील भेदभाव नष्ट करणे या बाबींचा समावेश आहे. कुष्ठरोग नियंत्रणासाठी सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील सर्व डॉक्टर, पॅथॉलॉजिस्ट, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ, आरोग्य कर्मचारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांनी निदान झालेल्या सर्व रुग्णांचा योग्य उपचार, पाठपुरावा तसेच त्यांच्या संपर्कातील व्यक्तींना पोस्ट एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (पीईपी) देणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत, सप्टेंबर २०२५ अखेर राज्यात ७,८६३ नव्या कुष्ठरुग्णांची नोंद झाली असून उपचाराखालील रुग्णांची संख्या १३,०१० आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना कुष्ठरोग निदान व नोंदणीसंबंधीच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांनी ही कुष्ठरोगाबाबत भीती बाळगू नये, लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. कारण हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. फक्त वेळेत निदान आणि उपचार आवश्यक आहे.

## विंचूर येथे संत शिरोमणी नामदेव महाराज जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.०२, विंचूर (नाशिक) :** वारकरी संप्रदायातील प्रमुख संतकवी, भक्ती चळवळीचे महान पुरोधा व नाथ संप्रदायातील तेजस्वी दीप असलेल्या विश्वसंत श्री संत नामदेव महाराज यांच्या ७५५ व्या जयंतीनिमित्त विंचूर येथील संत नामदेव महाराज मंदिरात मोठ्या भक्तिभावाने उत्सव पार पडला. पहाटे ६:०० वा. काकड आरतीने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. त्यानंतर विजय झनकर यांनी सहपत्नीक मंदिरात पूजा-अभिषेक करत संतांचे पाद्यपूजा केले. भक्तीगीत, अभंग, नामस्मरणाने संपूर्ण परिसर प्रसन्न भावनेने निनादत होता. अभिषेकानंतर आरती व फराळ प्रसादाचे वितरण करण्यात आले. संत नामदेव महाराजांच्या जयंतीनिमित्त मंदित शिंपी समाज बांधव, वारकरी मंडळी, महिला भगिनी व नागरिक उपस्थित होते. नामदेव महाराजांचा जन्म संवत्सर, शके ११९२, कार्तिक शुद्ध एकादशी, रोहिणी नक्षत्रावर झाला असल्याचे मानले जाते. त्यांनी मराठी तसेच व्रजभाषेत विपुल साहित्य रचून भक्तीमार्गाचे वैभव वाढवले. गुरू ग्रंथसाहिबात समाविष्ट होण्याचे भाग्य लाभलेले ते एकमेव मराठी संत असून, कीर्तनाद्वारे भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे महापुरुष म्हणून त्यांची ओळख आहे. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात पायरीचा दगड होण्याइतका नम्र भक्तिभाव त्यांनी जोपासला. संत नामदेव महाराजांच्या जयंतीनिमित्त सर्व भक्तांनी धन्य आजी दिन संत दर्शनाचा म्हणत कृतज्ञतेने वंदन केले.

## महानगरपालिका निवडणुकीत आपला उमेदवार कसा निवडवा विषयी परिसंवाद

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०२, मिरा भाईंदर :** सदभावना मंच आणि मूलभूत अधिकार संघर्ष समिती ने मिरा रोड येथे इस्लामिक सेंटर मध्ये दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते २ च्या वेळात येणाऱ्या नगरपालिका निवडणूक लक्षात ठेवून आपला नगर सेवक कसा निवडावा ह्या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. प्रमुख वक्ते श्रीकांत खानोलकर ह्यांनी उमेदवाराची पात्रता व आपल्या शहराची जाणकारी तसेच लोक संपर्क असणे गरजेचे आहेत. उमेदवाराला आपल्या वार्डातील रहिवासीच्या सुख दुःखात सामील होता आले पाहिजे. पण हल्ली निवडणूकित धर्म जात प्रांत पाहून मत मिळवता.

स्थानिक समस्या पेक्षा धार्मिक मुद्दे पुढे आणून निवडणूक सहज जिंकता येतात असे होताना पाहतो. उमेदवाराला विकासाची दृष्टी व त्यासाठीच्या योजनांवर काम करण्यासाठी प्रयत्न करावे हे अपेक्षित आहे. रोहित सुवर्णा हया वक्त्यांनी स्थानिक मुद्धयाची जाण असावी. शहरात रोज सकाळी ६ वाजल्यापासून कचरा उचलणाऱ्या गाड्या शहरात फिरतात. ओला कचरा व सुखा कचरा घेणाऱ्या गाड्या आपल्या कडे नाहीत. सोसायटीचा कचरा सफाई कर्मचारी सकाळी ८ वा सोसायटीबाहेर आणून ठेवतात त्याच्या अगोदर कचरा उचलणारी गाडी येऊन गेलेली असते ही समस्या बऱ्याच ठिकाणी आढळते. त्यामुळे दुर्गंधी पसरते.

मिरा भाईंदर महानगरपालिका ची डम्पिंग ग्राउंड ची जागा उत्तन ला आहे. त्यामुळे उत्तन च्या परिसरातील रहिवासीय त्रास सहन करीत आहे. दुर्गंधी रोगराई पसरते ते वेगळं त्या रहिवास्यांना शुद्ध हवा घेण्याचा अधिकार आहे. गारबेज रीसायकल प्लांट उभारले पाहिजे दुर्गंधी कमी करण्यासाठी उपाय करने गरजेचे आहे. धारावी जंजिरे किल्ला पाहण्या साठी आपल्या कुटुंबियाबरोबर जा आपल्या शहरातील इतिहासिक वारसा आपल्यालाच जपायचं आहे.सिराज शेख यांनी आपल्या भाषणात आपला नगरसेवक हा आपल्या नाला, गटर, पाणी व स्वच्छता यासाठी काम करणारा असावा. स्थानिक समस्या सोडवणारा, धर्मनिरपेक्ष असावा.

आजच्या कार्यक्रमला सर्व पक्षीय नेते व मास व सदभावनाचे कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात स्वागत ऍड. अलका पडळकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेरुरकरांनी केले. शेवटी सादिक शेख नी सर्वांचे कार्यक्रमला उपस्थित सर्व नेते व मास चे दिनेश राणे व त्यांचे कार्यकर्ते ह्यांचे आभार मानले.